**MHRG110005512026**

समरी केस क्र.३५६/२०२६

**<u>भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ (२०२३ चा अधिनियम क्र. ४६) अन्वये गुन्हयाचे विवरण श्रीमती ए. पी. मानव प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, यांचे न्यायालयात</u>**

| | | |
|---|---|---|
| १. | अपराध घडल्याचा दिनांक | : १९.०६.२०२६ |
| २. | अहवालाचा किंवा फिर्यादीचा दिनांक | : १९.०६.२०२६ |
| ३. | फिर्यादीचे नांव | : **सरकारतर्फे माणगांव पोलीस ठाणे** |
| ४. | आरोपीचे नाव | : **श्री. दत्ताराम गणपत सकपाळ** |
| | वय | : ४५ वर्षे |
| | राहणार | : रा. बोरवाडी ता. माणगांव जि. रायगड |
| ५. | गुन्हयाचे विवरण | : |

दिनांक १९.०६.२०२६ रोजी १८:३५ वाजताचे सुमारास माणगांव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मौजे निजामपुर बाजारपेठेत बस स्टॅण्ड समोर ता. माणगांव जि. रायगड येथे तुम्ही तुमच्या ताब्यातील पिकअप क्रमांक एम. एच.०६/सी. पी./४०८३ हे वाहन सार्वजनिक रोडवर येणा–या जाणा–या लोकांचे जिवितास धोका निर्माण होईल अशा रितीने रोडवर उभे करून वाहतुकीस अडथळा निर्माण केला म्हणून तुम्ही भा. न्या. सं. कलम २८५ अन्वये गुन्हा या न्यायालयाच्या कार्यक्षेत्रातमध्ये केला.

SONTAKKE AHILYABAI BALIRAM

Digitally signed by SONTAKKE AHILYABAI BALIRAM
Date: 2026.06.30 17:16:59 +0530

माणगांव

दिनांक ३०/०६/२०२६

(श्रीमती. ए. पी. मानव )

प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, माणगांव

प्रश्न १: तुम्हाला पोलीस टिपणाच्या नकला मिळाल्या काय ?

उत्तर : होय

प्रश्न २: तुमच्यावर ठेवण्यात आलेला दोषारोप तुम्हाला वाचून दाखवला तो तुम्हाला समजला काय ?

उत्तर : होय

प्रश्न ३: तुम्हाला गुन्हा कबुल आहे काय ?

उत्तर : होय

..............................

आरोपीची सही /अंगठा

SONTAKKE AHILYABAI BALIRAM

Digitally signed by SONTAKKE AHILYABAI BALIRAM
Date: 2026.06.30 17:17:05 +0530

माणगांव (श्रीमती. ए. पी. मानव )

दिनांक ३०/०६/२०२६ प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, माणगांव

## न्यायनिर्णय

सदर आरोपीविरूध्द भारतीय न्याय संहिता कलम २८५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. आज रोजी आरोपीने न्यायालयात सदर प्रकरणात स्वच्छेने गुन्हा कबुल करण्याची इच्छा व्यक्त केली आहे. गुन्हा कबुल केल्याबाबतची पुरशिस आरोपीने निशाणी क्र. ०२ वर दाखल केली आहे. आरोपीला गुन्हा कबुल केल्यानंतर होणा–या परिणामाची जाणीव करून देण्यात आली. त्यानंतर देखील आरोपीने स्वमर्जीने गुन्हा कबुल केला आहे. वरील प्राप्त परिस्थती लक्षात घेतली असता, सरकार पक्षाची तक्रारमधील कथने निर्विवादपणे सिद्ध झालेली आहेत. त्यामुळे आरोपीला सदर गुन्हाकरिता दोषी धरण्यात येत आहे. आरोपीने दया दाखविणेस विनंती केली आहे. त्याने नमुद केली की, तो घरातील एकमेव कमविता व्यक्ती आहे. आरोपीने केलेली विनंती, आरोपीचे वय. गुन्हाचे स्वरूप लक्षात घेता, आरोपीला द्रव्यदंडाची शिक्षा देणे न्यायोचित होईल, करिता खालीलप्रमाणे आदेश करण्यात येतो.

## आदेश

आरोपी **श्री. दत्ताराम गणपत सकपाळ** यास भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम २७५ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम २८५ चे गुन्हयाकरिता दोषी धरून सदर गुन्हयाबदद्ल आरोपीला एकुण **रक्कम रूपये १०००/– (अक्षरी एक हजार मात्र )** द्रव्यदंड ठोठावण्यात येत आहे. आरोपीने सदर दंडाची रक्कम न भरल्यास ०४ दिवसाचा साध्या कारावासाची शिक्षा भोगावयाची आहे.

SONTAKKE AHILYABAI BALIRAM

Digitally signed by SONTAKKE AHILYABAI BALIRAM
Date: 2026.06.30 17:17:13 +0530

माणगांव (श्रीमती. ए. पी. मानव )

दिनांक ३०/०६/२०२६ प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, माणगांव